# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी**

**दोन : नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय**

**तीन : प्रश्नोत्तरे**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री. पंकज भुजबळ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनेक गावांचा समावेश असून मोठ्या प्रमाणावर भाजीपाला, फळबाग, फुलशेती व विविध कृषी उत्पादन घेतले जात असणे, मात्र शहर परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्याधुनिक कृषीमाल विक्री केंद्र उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना आपला कृषीमाल विक्रीसाठी मुंबईसह इतर शहरांमध्ये न्यावा लागत असणे, त्यामुळे वाहतूक खर्च वाढणे, वेळेचा अपव्यय होणे तसेच शीतगृह सुविधा नसल्याने कृषीमालाची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत असून शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असणे, नाशिकमध्ये कृषीमाल विक्री केंद्र उभारण्याची मागणी अनेक वेळा शेतकऱ्यांकडून करण्यात आलेली असणे, शेतकरी, व्यापारी व ग्राहक यांना एकाच ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अत्याधुनिक शीतगृहासह बहुउद्देशीय शेतकरी-व्यापारी-ग्राहक मार्केट उभारणे अत्यंत आवश्यक असणे, सदर प्रकल्पामुळे शेतमालाला स्थानिक स्तरावर योग्य बाजारपेठ उपलब्ध होऊन कृषीमालाची नासाडी कमी होण्यास मदत होईल व ग्राहकांना ताजा व दर्जेदार कृषीमाल सहज उपलब्ध होणार असणे, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात अत्याधुनिक शीतगृहासह बहुउद्देशीय शेतकरी-व्यापारी-ग्राहक मार्केट उभारण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी वा त्यासुमारास शासनास पत्रव्यवहार केला असणे मात्र शासनाकडून दिरंगाई व टाळाटाळ होत असणे, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील मोडकळीस आलेल्या पागडी इमारतींमध्ये राहणाऱ्या हजारो कुटुंबीयांच्या डोक्यावर मृत्यूची टांगती तलवार कायम असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आलेली असणे, मुंबई उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या न्यायिक समितीने सादर केलेल्या अहवालातून शहरातील सेस उपकर प्राप्त इमारतीमधील भयाण वास्तव समोर आलेले असणे, घर मालकांचा लोभ, विकासाचे हितसंबंध आणि प्रशासकीय भ्रष्टाचार यामुळे मुंबईतील पागडी इमारतींमध्ये राहणारे ४ लाख भाडेकरू आजही अत्यंत धोकादायक घरांमध्ये जीव मुठीत धरून राहत असल्याचे समितीने स्पष्ट केलेले असणे, ब्रिटिश काळात बांधल्या गेलेल्या या इमारतीची अवस्था अत्यंत बिकट असून वारंवार दिल्या जाणाऱ्या नोटिसा आणि तांत्रिक धोके असूनही मालक, विकासक व रहिवासी यांच्यातील वादामुळे या इमारतींचा पुनर्विकास वर्षानुवर्षे कागदावरच राहिलेला असणे, मालक पुनर्विकास करीत नसल्याने म्हाडाकडून कलम ७९-अ अंतर्गत ९३५ नोटीसा बजावण्यात आल्या असणे, मात्र ही कायदेशीर प्रक्रिया रहिवाशांना न्याय देण्याऐवजी खटले आणि विलंबाचे कारण ठरत असणे, परिणामी पागडीच्या सदनिकेत राहणाऱ्या रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष व संतापाची भावना, पागडी इमारतीचा पुनर्विकास करून त्यात राहणाऱ्या रहिवाशांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ. परिणय फुके, श्री. सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे जिल्ह्यातील बारवी धरणातील जलसाठा अवघ्या ३५ टक्क्यांवर आल्याने माहे एप्रिल, २०२६ दरम्यान जिल्ह्यात तीव्र पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले असल्याचे निदर्शनास येणे, वाढते तापमान, औद्योगिक व नागरी क्षेत्रातील वाढता पाणीवापर तसेच जलस्रोतांतील घटलेली जलपातळी यामुळे धरणसाठा झपाट्याने कमी झाल्याची बाब शासनाने सर्वेक्षणाद्वारे निश्चित केली असणे, शहापूर, मुरबाड व बदलापूर परिसरातील पाणीटंचाईग्रस्त नागरिकांना सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत

असणे, उपलब्ध पाणी साठ्याचे नियोजन, पाणी कपातीचे नियंत्रण व औद्योगिक नागरी वापराचे संतुलन राखण्यासाठी शासनाने तातडीची धोरणात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, जलसंधारण, जलपुनर्वापर, नवीन जलस्रोत निर्मिती व एकात्मिक जलव्यवस्थापनासाठी दीर्घकालीन उपाययोजना करून पाणीटंचाई निवारण करावे व नागरिकांना दिलासा देण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"एमआयडीसीतील गृहनिर्माण संस्थांच्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी ड्राफ्ट सीडीसीपीआरमध्ये बदल करण्याबाबत एमआयडीसी पुनर्विकास समिती सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करीत असणे, या इमारती जुन्या व मोडकळीस आल्या असून त्यांच्या पुनर्विकासाची गरज निर्माण झाली असणे, तथापि, एमआयडीसीच्या ड्राफ्ट सीडीसीपीआरचा आधार घेत "सदनिका वाढीची तरतूद नाही" हे कारण पुढे करून प्रस्ताव नामंजूर केला जात असून "जितक्या जुन्या सदनिका तितक्याच नव्या" अशी अट घातली जात असल्याने आर्थिकदृष्ट्या प्रकल्प व्यवहार्य ठरत नसून या संस्था स्वयंपुनर्विकास करू शकत नसणे किंवा कोणताही विकासक पुढे येत नसणे, त्यामुळे जोपर्यंत पुनर्विकासासाठी वाढीव एफएसआय किंवा अतिरिक्त सदनिकांचे बांधकाम आणि त्याची विक्री याकरिता एमआयडीसी परवानगी देत नाही तोपर्यंत या इमारतींचा पुनर्विकास शक्य होणार नसणे, हजारो कुटुंबांच्या सुरक्षित आयुष्याचा विचार करून एमआयडीसीच्या ड्राफ्ट सीडीसीपीआरमध्ये तातडीने दुरुस्ती करण्याची नितांत आवश्यकता, तथापि, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी, हजारो कुटुंबांवर जीव मुठीत घेऊन राहण्याची आलेली वेळ, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री सुनिल शिंदे, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री सदाशिव खोत, डॉ. परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर डहाणू तालुक्यातील धानिवरी येथे दिनांक १८ मे, २०२६ रोजी साखरपुड्यासाठी निघालेल्या वऱ्हाडाचा ट्रक आणि कंटेरनमध्ये झालेल्या भीषण अपघातात १३ जणांचा मृत्यू आणि २५ जण जखमी झाले असणे, अपघातग्रस्त ट्रकमधून जवळपास ६० वऱ्हाड्यांची खुलेआम सुरू असलेली अवैध वाहतूक, तत्पूर्वी कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर रायते पुलावर सिमेंट मिक्सर आणि प्रवासी व्हॅन यांच्यात भीषण टक्कर होऊन व्हॅनचालकासह ११ जणांचा मृत्यू झाला असल्याची दुर्घटना दिनांक १३ एप्रिल, २०२६ रोजी घडली असणे, या भीषण अपघातात चक्काचूर झालेल्या व्हॅनचा पत्रा कापून प्रवाशांचे मृतदेह बाहेर काढावे लागणे, मृतांमध्ये तीन सख्ख्या भावंडांचा समावेश असणे, या अपघातांमुळे ऐरणीवर आलेला अवैध वाहतुकीचा मुद्दा, राज्यातील विविध मार्गावरील मुदतबाह्य वाहनांमधून क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची होत असलेली वाहतूक हा कायमच असलेला चिंतेचा विषय, विशेषत: ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतुकीच्या अपुऱ्या सोयीसुविधांमुळे सामान्य नागरिकांना घ्यावा लागत असलेला अवैध प्रवासी वाहतुकीचा आसरा, याबाबत असंख्य तक्रारी येत असतानाही कारवाई करण्याकडे प्रशासनाकडून होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या अपघातात निष्पाप प्रवाशांचे जात असलेले नाहक बळी, यास्तव राज्यातील विविध मार्गावर सुरू असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सात : शासकीय विधेयक —**

**(१) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(क)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ — भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ — भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६"

विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(ख)** सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**आठ** : **सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, सदाशिव खोत, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, पंकज भुजबळ, प्रसाद लाड, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री संजय खोडके, श्रीकांत भारतीय, कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, डॉ. परिणय फुके, श्री. किशोर दराडे, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, विक्रांत पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री वसंत खंडेलवाल, अमित गोरखे, ज्ञानेश्वर म्हात्रे, अमरिशभाई पटेल, प्रमोद जठार, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, श्रीमती माधवी नाईक, सर्वश्री संजय भेंडे, राजहंस सिंह, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"सन १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आतापर्यंत अतिवृष्टी, अनावृष्टी, विषाणूजन्य रोग इत्यादीमुळे शेतकरीबांधव व शेतीव्यवसाय अनेकवेळा अडचणीत येणे, परंतु, सन २०१४ पर्यंत तत्कालीन शासनाने राज्यशासनाच्या तिजोरीतून एकदाही कर्जमाफी न देणे, सन २०१४ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर पहिल्यांदा राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मानयोजना राबवून लाखो शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा प्रयत्न करणे, सन २०२०-२०२१ मध्ये

तत्कालीन राज्य शासनाने महात्मा ज्योतीबा फुले कर्जमुक्ती योजना जाहीर करणे परंतु कर्जाची मर्यादा रुपये २ लाख असल्याने अधिक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ न मिळणे, विद्यमान शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर करणे मात्र, या योजनेमध्ये दोन लाखांवर कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचाही समावेश असणे, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी रुपये ५० हजारपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची योजना समाविष्ट असणे, या सोबतच आत्महत्याग्रस्त जिल्हयातील कापसाच्या उत्पादन वाढीसाठी 'कापूस उत्पादकता मिशन'ची केंद्रे स्थापन करण्याचे प्रयोजन असणे, एलनिनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे एप्रिल, २०२६ मध्येच घेऊन अधिकाऱ्यांना सूचना देणे, त्याअनुषंगाने जलयुक्त शिवार टप्पा २ च्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यामध्ये जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात करण्यात येणे, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी सर्वांचा सहभाग घेऊन लोकचळवळ उभी करण्याची आवश्यकता, राज्यात 'नमो शेतकरी महासन्मान योजना', 'कृषी समृध्दी योजना', 'महाडिबीटी एकत्रित प्रणाली', 'महिला शेतकरी व गोपालकांसाठी योजना' राबविण्यात येणे, शेतीत फवारणी, पिक निरिक्षण, किड नियंत्रण, जमिनीचे विश्लेषण इ. साठी ड्रोन व रोबोटिक्सचा वापर करण्यात येणे, शेती क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी मोठी भांडवली गुंतवणूक करण्याचे शासनाचे प्रयोजन असणे, गोपीनाथ मुंडे अपघात अनुदान योजनेचा विस्तार करुन त्यात शेतमजुरांनाही विमा संरक्षण देण्यात येणे, 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजना' राबविण्यात येणे, संपूर्ण राज्यात 'महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान' राबविण्यात येणे, अशाप्रकारे राज्यातील शेतकरी स्वयंपूर्ण व कर्जमुक्त होण्याच्या दृष्टीने आणि नैसर्गिक बदलाचा सामना करण्यास सक्षम होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने घेतलेले निर्णय व त्याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**राज्यात मराठी भाषा संवर्धनासाठी राज्यस्तरीय संस्था उभारुन धोरण निश्चिती करण्याबाबत**" या विषयावरील श्री. सतेज उर्फ बंटी पाटील यांचा दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र. ३ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ४८१४ ला दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **सर्वश्री सतेज उर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**महाज्योतीचे शेतीपुरक व्यवसाय व उद्योग उभारणीकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत**" या विषयावरील श्री. सुधाकर अडबाले व इतर वि.प.स. यांचा दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र. २१ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक २५९७ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २२ जून, २०२६.

**डॉ.विलास आठवले,**
सचिव - ३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद.